**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक : ०५**

---

**विषय क्रमांक : ५४** **दिनांक :- १५/०७/२०२२**

---

**प्रस्तावाचा विषय :-** कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरूपात डॉ.सौ.रेणूका प्रणव जोशी यांची करारानुसार अटी व शर्ती प्रमाणे तांत्रिक खंड देवून पुढील सह महिन्याकरिता स्वरूपात वैद्यकीय अधिकारी या पदावर पुर्ननियुक्ती करणे व त्यांचे मानधनामध्ये १०% वाढ करणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट.
**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका आस्थापना विभाग
**संदर्भ :-** १.डॉ.सौ.रेणूका प्रणव जोशी यांचा दिनांक २२/०२/२०२२ रोजीचा अर्ज.
२. प्र.वैद्यकिय अधिकारी ,कै.बा.दे.दवाखाना यांचे कडील जा.क्र.११० दि.१३/०५/२०२२ अन्वयेचा प्रस्ताव.

उपरोक्त विषयान्वये प्रस्ताव सादर करण्यात येतो की,डॉ.सौ.रेणूका प्रणव जोशी,यांनी दिनांक २४/०२/२०२२ रोजी अर्ज देवून सद्यस्थितीमध्ये दरमहा रू.२८,०००/-मानधन अदा करण्यात येत आहे.एन.यु.एच.एम.विभागाकडील पुर्ण वेळ वैद्यकीय अधिकारी यांच्या प्रमाणे रू.६०,०००/-मानधन वाढवून मिळणे बाबत मागणी केलेली असून त्यानुषंगाने कै.बा.दे.दवा.यांचेकडील जा.क्र.११० दि.१३/०५/२०२२ अन्वये प्रस्ताव सादर करून त्यामध्ये "सध्या आरोग्य विभाग एन.यु.एच.एम. विभागाकडील पुर्ण वेळ वैद्यकीय अधिकारी यांचे शैक्षणिक अर्हता MBBS अशी असून डॉ.सौ.जोशी यांची शैक्षणीक अर्हता B.A.M.S अशी आहे,त्यामुळे त्यांना एन.यु.एच.एम.विभागाकडील B.A.M.S शैक्षणिक पात्रता असलेल्या वैद्यकीय अधिकारी यांना दरमहा रू.३४,५००/- मानधन देण्यात येत आहे.सदर अर्ज केलेल्या वैद्यकिय अधिकारी अधिका-यांच्या B.A.M.S दरमहा मानधनाच्या विचार करता डॉ.सौ.रेणूका जोशी यांना रू.३४,५००/-मानधन देणेस शिफारस आहे " असे नमुद करून सुचित केलेले आहे.

कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना यांचेकडील वेळोवेळी सादर झालेल्या प्राप्त प्रस्तावाच्या अनुषंगाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमामधील ५३ च्या तरतुदीनुसार मा.स्थायी समितीच्या पुर्व मंजुरीने कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी डॉ.सौ.रेणुका प्रणव जोशी यांची करारा नुसार अटी व शर्ती प्रमाणे तांत्रिक खंड देवून वेळोवेळी सहा-सहा महिन्या करीता तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी यापदी रू.२८,०००/- या दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्तीबाबत कार्यवाही करण्यात येत आहेत.

संबधितांच्या अर्जाच्या अनुषंगाने सद्यस्थितीमध्ये त्यांना देण्यात येणा-या मानधनामध्ये वाढ करणे झाल्यास सद्यस्थितीमध्ये मनपाची आर्थिक बिकट परिस्थितीचा विचार होवून सदरचा देण्यात येणा-या दरमहा मानधनामध्ये १०% प्रमाणे वाढ करणे झाल्यास सदरची बाब ही आर्थिक स्वरूपाची धोरणात्मक बाब असल्याने सदर प्रस्तावास मा.स्थायी समितीची याबाबत पुर्व मान्यता घेणे संयुक्तीक होईल,
त्यानुंषंगाने दरमहा मानधनवाढी बाबतचा तपशिल खालीलप्रमाणे दर्शविण्यात येत आहे.

| अ.नं. | तात्पुरत्या स्वरूपात पदनाम | विभाग | कायम नियुक्ती अंदाजे वेतन | सध्याचे देण्यात दरमहा मानधन रू | १०% प्रमाणे प्रस्तावित मानधनवाढ दरमहा एकुण मानधन रू. |
|---|---|---|---|---|---|
| १ | वैद्यकीय अधिकारी | कै.बा.दे.दवाखाना | ४२,७२२/- | २८,०००/- | ३०,८००/- |

सदस्थितीमध्ये डॉ.सौ.रेणूका प्रणव जोशी यांची कै.बाळासाहेब देशपांडे दवाखान्याकरिता तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकिय अधिकारी यापदी अटी व शर्तीनुसार करारबध्द नियुक्ती कार्यवाही बाबत यापुर्वी केलेल्या मानधनामध्ये वाढ बाबतची माहिती खालील प्रमाणे आहे.

| अ.नं. | नियुक्ती आदेश क्र.दि. | दरमहा मानध रू. | केव्हा पासून मानधन वाढ दि. | मा.स्था.स.ठ.क्र. दि. |
|---|---|---|---|---|
| १ | ६६७३/२३/१२/२०१४ | २०,०००/- | दि.२३/१२/२०१४ पासून | जाहिरातीमधील नमूद केल्यानुसार मा.आयुक्त यांचे मान्यतेने |
| २ | ११८७/२४/०१/२०१९ | २८,०००/- | दि.२९/१०/२०१८ | मा.स्था.स.ठ.क्र.५१ दि.२९/१०/२०१८ चा पारित ठराव |

तरी डॉ.सौ.रेणूका प्रणव जोशी यांचे अर्जावरील कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना यांचेकडील संदर्भिय जा.क्र.११०दिनांक १३/०५/२०२२ अन्वयेच्या अहवालाच्या अनुषंगाने कै.बाळासाहेब देशपांडे दवाखन्या करिता करारानुसार अटी व शर्ती प्रमाणे तांत्रिक खंड देवून पुढील सहा महिन्याकरीता तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी B.A.M.S यापदावरील नियुक्तीकरीता वरील दर्शविल्यानुसार दरमहा मानधनामध्ये १०%प्रमाणे मानधनामध्ये वाढ करणे बाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे निर्णयाकरीता पाठविणे बाबत प्रस्तुत प्रकरणी मा.मुख्य लेखाधिकारी व मा.मुख्य लेखापरिक्षक यांचा अभिप्राय होवून सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे पाठविणेस मान्यतेस्तव आदेशार्थ सादर.

येणे प्रमाणे सहाय्यक आयुक्त यांचा अहवाल असे.

यावर मुख्यलेखाधिकारी यांचा अभिप्राय की,१०%मानधन वाढीबाबत आदेशार्थ सादर.

यावर मुख्य लेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,मानधन वाढ ही आर्थिक बाब असल्याने मा.स्थायी समितीकडे पाठविणेस "अ" नुसार उचित राहील.

यावर मा.उपायुक्त (सा) प्रस्तावित नुसार पुढील कार्यवाहीसाठी मा.स्थायी समितीपुढे सादर करणेस मान्यतेस्तव सादर.

यावर मा.अति.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, "अ" मध्ये प्रस्तावित केल्यानुसार निर्णयास्तव मा.स्थायी समिती कडे पाठविण्यास मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभेपुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरूपात डॉ.सौ.रेणूका प्रणव जोशी यांची करारानुसार अटी व शर्ती प्रमाणे तांत्रिक खंड देवून पुढील सह महिन्याकरिता स्वरूपात वैद्यकीय अधिकारी या पदावर पुर्ननियुक्ती करणे व त्यांचे मानधनामध्ये १०% वाढ करणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट.

मा.श्री.विनीत पाअुलबुधे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार ऑफिस रिपोर्टचे सभेमध्ये वाचन करण्यात आले.

मा.श्री.मुदस्सर शेख :- मध्यंतरीच्या काळामध्ये झेंडीगेट प्रभागातील अतिक्रमण काढते वेळी झालेल्या दगडफेकीच्या प्रकाराची माहिती देण्यात यावी.

प्रभाग अधिकारी प्र.क्र.३ श्री.लहारे :- अतिक्रमण काढणे बाबत नागरीकांच्या तक्रारीअर्जावरून अतिक्रमण काढण्यात आलेले आहे.नगररचना विभागाचा अभिप्राय घेण्यात आला होता.सार्व.जागेतील अतिक्रमण होते.महानगरपालिकेच्या जागेमध्ये ड्रेनज लाईन टाकण्यात आलेली होती.संपुर्ण काम झाल्यानंतर तेथील काही जमावातील नागरीकांनी अतिक्रमण पथकावर दगडफेक केली.

मा.श्री.मुदस्सर शेख :- सर्व्हे नं.६४ या जागेवरील बांधकामाबाबत कोर्टाची स्टे ऑर्डर होती.

मा.श्री.विनीत पाअुलबुधे :- या पुर्वी अहमदनगर शहरामधील कोणत्याही प्रभागातील अतिक्रमण काढतेवेळी अतिक्रमण विभाग पोलीस बंदोबस्त घेवून अतिक्रमण काढले जाते.यावेळी पोलीस बंदोबस्त का घेण्यात आला नाही.पुर्वीच्या घटना पाहून पोलीस बंदोबस्त घेणे आवश्यक होते.

मा.श्री.मुदस्सर शेख :- अतिक्रमण काढते वेळी एखादी मोठी घटना घडली तर त्याची जबाबदारी कोण घेणार?

मा.श्री.विनीत पाअुलबुधे :- संवेदनशिल भागामध्ये तसेच इतर ठिकाणची अतिक्रमण काढतेवेळी पोलीस बंदोबस्त घेणे बाबत समज देण्यात यावी.पुढील वेळी बंदोबस्त घेवून कार्यवाही करण्यात यावी.मारहाण प्रकरण झाल्यानंतर दुस-याच दिवशी पोलीस बंदोबस्त घेवून त्या ठिकाणी राहिलेले अतिक्रमण बांधकाम काढणे आवश्यक होते.

मा.उपायुक्त (कर)श्री.डांगे :- अतिक्रमण काढतेवेळी पोलीस बंदोबस्त घेणे आवश्यक होते.पुढील वेळी अतिक्रमण काढतांना पोलीस बंदोबस्तामध्ये कार्यवाही करण्यात येईल.सदर घटना घडल्यानंतर गुन्हा नोंदविणे करीता मी स्वत: व कामगार युनियन पदाधिकारी समवेत पोलीस स्टेशन मध्ये हजर होते.गुन्हा नोंदविल्यानंतर दुस-या दिवशी महानगरपालिका कामकाज चालू ठेवणे आवश्यक होते.परंतु युनियन ने अचानक सर्व प्रभाग कार्यालय व मुख्यालय येथे कर्मचारी सभा मिटींग घेवून दैनंदिन कामकाज बंद केले.

मा.श्री.शेख मुदस्सर शेख :- संपुर्ण महानगरपालिकेचे एक दिवस कामकाज बंद ठेवून नागरीकांना वेठीस धरलेले आहे.

मा.सभापती साहेब :- महानगरपालिका हद्दीमध्ये अतिक्रमण काढतेवेळी पोलीस बंदोबस्त घेणे आवश्यक आहे.इतर कामांकरीता पोलीस बंदोबस्त घेण्यात येतो.याच अतिक्रमण मोहिमेवेळी बंदोबस्त का घेण्यात आला नाही.दगडफेक प्रकरणानंतर याच ठिकाणी अतिक्रमण काढणे बाबत कार्यवाही करणे आवश्यक होते.

मा.श्री. विनंती पाअुलबुधे :- कर्मचारी,अधिकारी यांनी जबाबदारीने कामे करावीत.महानगरपालिकेची निष्क्ारण नामुष्की व्हायला नको.पोलीस बंदोबस्त असता तर दगडफेक, मारहाण असले प्रकार झाले नसते.

मा.श्री.मुदस्सर शेख :- यापुढील प्रत्येक अतिक्रमण मोहिमेवेळी पोलीस प्रशासनाला प्रत्र देवून बंदोबस्ताची मागणी करा.

मा.सभापती साहेब :- सावेडी येथील महानगरपालिकेच्या जागेमधील एन.सी.सी.कार्यालय येथील जागेमध्ये शॉपींग कॉम्प्लेक्स बांधकाम करणे बाबत काय कार्यवाही करण्यात आली ? या बाबतची माहिती देण्यात यावी.

मा.नगररचनाकार श्री.चारठाणकर :- एन.सी.सी.कार्यालयाच्या जागेवरील गाळे, मार्केट विभागामार्फत भाडेतत्वावर देण्यात आलेले आहे.सदर गाळे रिकामे करणे करीता,मार्केट विभागामार्फत नोटिस देणे बाबत सांगीतलेले आहे.

मार्केट विभाग प्रमुख श्री.सोनवणे :- एन.सी.सी.च्या जागेवरील गाळे खाली करणे संदर्भात संबंधितांना १५ दिवसांपुर्वी नोटीस देण्यात आलेली आहे.

मा.श्री.रविंद्र बारस्कर :- १५ दिवसांपुर्वी नोटिस दिलेली आहे.सदरचा विषय हा चार महिन्यापासून चालू होता.महानगरपालिकेची जागा असून जागा खाली करण्यास उशिर होत आहे.सदरच्या गाळे धारकांना पर्यायी जागा उपलब्ध करून दयावी.

मार्केट विभाग प्रमुख श्री.सोनवणे :- पर्यायी जागा उपलब्ध होत नसल्याने गाळे खाली करण्यास विलंब होत आहे.

मा.सभापती साहेब :- सदर जागेवरील गाळयांचा करार हा १० वर्षापुर्वीच संपला आहे.ऐकीकडे गाळे खाली करणे संदर्भात कार्यवाही करण्यात यावी.दुसरीकडे सदर जागेवर बांधावयाच्या बांधकामाबाबत आर्किटेक इंजिनियर्स यांचे मार्फत बिल्डींग प्लॅन तयार करून घेण्यात यावा.

मा.श्री.रविंद्र बारस्कर :- एन.सी.सी.कार्यालयाच्या जागेवर बांधावयाच्या बांधकामाकरीता एका अधिका-याची नियुक्ती करण्यात यावी.

मा.सभापती साहेब :- सावेडी येथील महानगरपालिकेच्या एन.सी.सी.कार्यालयाच्या जागेवर शॉपिंग कॉम्प्लेक्स बांधणे बाबतच्या इमारतीचे डिझाईन व प्रकल्प व्यवस्थापनाचे काम मनपा पॅनलवरील आर्केटेक इंजिनियर स्पॅनेक्स ए.ई .सी सोल्युशन्स प्रा.ली.,पुणे यांच्या कडे देण्यात यावे.

मा.शहर अभियंता श्री.इथापे :- बांधकाम विभाग ,नगररचना विभाग,आर्किटेक इंजिनियर.यांचेशी चर्चा करून सदर बांधकामाबाबत दोन टप्यात प्रस्ताव देवू.सदर ठिकाणी २.५ ते ३.०० एफ.एस.आय.मिळेल.सदर ठिकाणी चांगल्या मोठया प्रमाणात बांधकाम करता येईल.

मा.सभापती साहेब :- सदर बांधकामाकरीता मा.शासनाकडून निधी प्राप्त करून घेणे करीता मा.शासनाकडे पाठपुरवा करण्यात यावा तसेच सदर कामास गती देणे आवश्यक असल्याने,सहाय्यक संचालक नगररचना श्री.राम चारठाणकर यांची नियुक्ती करण्यात येवून,शहर अभियंता,मार्केट विभाग प्रमुख यांच्या संयुक्त बैठका घेवून या बैठकीबाबतचा अहवाल सादर करण्यात यावा.

शहर अभियंता श्री.इथापे :- मा.स्थायी समितीच्या निर्णयानुसार कामकाज सुरू करू.

मा.सभापती साहेब :- विषय क्रमांक ५४ बाबत माहिती देण्यात यावी.

वैद्यकिय आरोग्य अधिकारी,बा.दे.दवा. डॉ.राजुरकर :- कै.बाळासाहेब देशपांडे दवाखान्याकरीता तात्पुरत्यास्वरूपात नियुक्तीस असलेल्या डॉ.रेणुका जोशी यांना सध्यादेण्यात येत असलेल्या मानधनामध्ये १० टक्के वाढ मागीतलेली आहे.डॉ.जोशी या स्त्री वैद्यकीय अधिकारी म्हणून काम पहात

आहेत.त्यांना सध्या २० हजार रूपये मनधन दिले जात आहे.साधारण आठ वर्षापासुन काम पहात आहेत.

मा.सभापती साहेब :- रक्कम रूपये ३४,५००/- मानधन यापुर्वी मानधनावरील डॉक्टरांना दिले आहे का? त्यांचे काय काम आहे.

वैद्यकिय अधिकारी श्री.राजुरकर :- आठ वर्षापासुन कामावर असून ओ.पी.डी.चे संपुर्ण कामकाज पहातात.

मुख्यलेखापरिक्षक श्री.मोरे :- मा.शासन निर्णयानुसार निर्णय घ्यावा लागेल.त्यांच्या मानधनामध्ये वाढ करण्यात यावी पण मानधन जास्तही वाढवू नये.

मा.श्री.विनीत पाउुलबुधे :- डॉ.रेणूका जोशी यांचे दैनंदिन मानधनामध्ये १० टक्के वाढ करण्यात यावी.

मा.श्री.मुदस्सर शेख :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.विषय पत्रिकेतील विषय क्रमांक ५५ ते ५७ हे नियुक्तीबाबतचे असल्याने मंजूर करण्यात यावेत.

मा.श्री.रविंद्र बारस्कर :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.विषय क्रमांक ५५ ते ५७ मानधनावरील नियुक्ती बाबतचे असल्याने या सर्व विषयांचे ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावेत.

मा.सभापती साहेब :- कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरूपात डॉ.सौ.रेणूका प्रणव जोशी यांची करारानुसार अटी व शर्ती प्रमाणे तांत्रिक खंड देवून पुढील सहा महिन्याकरिता तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी या पदावर पुर्ननियुक्तीकरण्यास व त्यांना देण्यात येणा-या सध्याच्या मानधनामध्ये १०% वाढ करण्यास मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर. सावेडी येथील महानगरपालिकेच्या एन.सी.सी.कार्यालयाच्या जागेवर शॉपिंग कॉम्प्लेक्स बांधणे बाबतच्या इमारतीचे डिझाईन व प्रकल्प व्यवस्थापनाचे काम मनपा पॅनलवरील आर्केटेक इंजिनियर स्पॅनेक्स ए.ई .सी सोल्युशन्स प्रा.ली.,पुणे यांच्या कडून करून घेण्यास मान्यता देण्यात येत आहे. सदर बांधकामाकरीता मा.शासनाकडून निधी प्राप्त करून घेणे करीता मा.शासनाकडे पाठपुरवा करण्यात यावा तसेच सदर कामास गती देणे आवश्यक असल्याने,सहाय्यक संचालक नगररचनाकार श्री.राम चारठाणकर यांची नियुक्ती करण्यात येवून,शहर अभियंता,मार्केट विभाग प्रमुख यांच्या संयुक्त बैठका घेवून या बैठकीबाबतचा अहवाल सादर करण्यात यावा.विषय क्रमांक ५५ ते ५७ चे ऑफिस रिपोर्ट मंजूर.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट नुसार कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरूपात डॉ.सौ.रेणूका प्रणव जोशी यांची करारानुसार अटी व शर्ती प्रमाणे तांत्रिक खंड देवून पुढील सहा महिन्याकरिता तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी या पदावर पुर्ननियुक्तीकरण्यास व त्यांना देण्यात येणा-या सध्याच्या मानधनामध्ये १०% वाढ करण्यास मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर.तसेच सावेडी येथील महानगरपालिकेच्या एन.सी.सी.कार्यालयाच्या जागेवर शॉपिंग कॉम्प्लेक्स बांधणे बाबतच्या इमारतीचे डिझाईन व प्रकल्प व्यवस्थापनाचे काम मनपा पॅनलवरील आर्केटेक इंजिनियर स्पॅनेक्स ए.ई .सी सोल्युशन्स प्रा.ली.,पुणे यांच्या कडून करून घेण्यास मान्यता देण्यात येत आहे. सदर बांधकामाकरीता मा.शासनाकडून निधी प्राप्त करून घेणे करीता मा.शासनाकडे पाठपुरवा करण्यात यावा तसेच सदर कामास गती देणे आवश्यक असल्याने,सहाय्यक संचालक नगररचनाकार श्री.राम चारठाणकर यांची नियुक्ती करण्यात येवून,शहर अभियंता,मार्केट विभाग प्रमुख यांच्या संयुक्त बैठका घेवून या बैठकीबाबतचा अहवाल सादर करण्यात यावा.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.मुदस्सर शेख सही/-

अनुमोदक :- मा.श्री.रविंद्र बारस्कर सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक : ०५**

**विषय क्रमांक : ५५** **दिनांक :- १५/०७/२०२२**

---

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुत्या स्वरूपात मोहीनी अशोक गुंजाळ (बेरड) यांची परिचारीका यापदी तांत्रिक खंड देवुन अटी शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्तीबाबत ऑफीस रिपोर्ट

**संदर्भ-** १. मा.स्थायी समिती ठराव क्र.१४२ दिनांक ११/०१/२०२२ अन्वयेच्या मानधनवाढी बाबतचा पारीत ठराव.

२. कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना यांचेकडील जा.क्र.कै.बा.दे.दवा.९० दि.०९/०५/२०२२ चा प्रस्ताव

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका आस्थापना विभाग

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये प्रस्ताव सादर करण्यात येतो की,कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना यांनी त्यांचेकडील जा.क्र.बा.दे.दवा.९० दि.०९/०५/२०२२ अन्वये प्रस्ताव सादर करून त्यामध्ये "कै.बाळासाहेब देशपांडे दवाखान्याकरीता करारानुसार तातपुरत्या स्वरूपात परिचारीका यापदी मोहिनी अशोक गुंजाळ (बेरड) यांची अटी व शर्तीनुसार मानधनावरील पुर्ननियुक्तीचा कालावधी दि.०१/१२/२०२१ सहा महिन्यांकरिता असून सदरची मुदत ही दि.दिनांक ३०/०५/२०२२ रोजी पासुन समाप्त झालेली असल्याने त्यांना तांत्रिक खंड देवून दि.०३/०६/२०२२ पासुन पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर पुर्ननियुक्ती करणे बाबत" सुचित केलेले आहे.

सदस्थितीमध्ये मा.स्थायी समिती ठराव क्र.१४५ दिनांक ११/०१/२०२२ च्या पुर्व मान्यता पारित ठरावाच्या अनुषंगाने जा.क्र.आस्था कालबध्द नेमणुक ३९६ दि.०४/०२/२०२२ अन्वये कै.बाळासाहेब देशपांडे दवाखान्यासाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरुपात परिचारीका यापदी मोहिनी अशोक गुंजाळ (बेरड) यांची रू.१०,४००/- या दरमहा मानधनावर अटी व शर्ती प्रमाणे तांत्रिक खंड देवून दि.०१/१२/२०२१ पासुन सहा महिन्याकरीता करारबध्द पुर्ननियुक्ती करण्यात आलेली असून सदरची मुदत ही दिनांक ३१/०५/२०२२ रोजी पासुन समाप्त होणार आहे.

दरम्यानच्या काळात कै.बाळासाहेब देशपांडे दवाखान्यामधील तात्पुरत्या स्वरूपात परिचारीका यापदी दरमहा मानधनावर नियुक्तीकरिता १०% प्रमाणे दरमहा मानधन वाढ करणेबाबतचा प्रस्ताव निर्णयाकरिता मा.स्थायी समितीकडे इकडील जा.क्र.आस्था ३५१० दि.०८/११/२०२१ अन्वये पाठविण्यात आलेला होता.त्यानुषंगाने मा.स्थायी समिती ठराव क्र.१४२ दि.११/०१/२०२२ अन्वये खालील प्रमाणे ठराव पारीत करून मान्यता दिलेली आहे.

"कै.बाळासाहेब देशपांडे दवाखान्याकरिता करारानुसार अटी व शर्ती प्रमाणे तांत्रिक खंड देवुन पुढील सहा महिन्याकरिता तात्पुरत्या स्वरूपात परिचारीका यापदांवरील नियुक्तीस मान्यता देण्यात येत आहे.तसेच त्यांच्या सध्याच्या मानधनामध्ये रक्कम रूपये ४५% ने वाढ करण्यास मान्यता देण्यात येत आहे.खर्च मंजूर."

यापुर्वी अहमदनगर महानगरपालिकेच्या कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना वैद्यकीय अधिकारी यांचे प्रस्तावाच्या अनुषंगाने तात्पुरत्या स्वरूपात परिचारीका यापदी सहा महिन्याकरिता अटी व शर्ती प्रमाणे दरमहा मानधनावर नियुक्ती बाबत वर्तमान पत्रामध्ये जाहिरात प्रसिध्दीस देवून थेट पध्दतीने उमेदवारांच्या मुलाखती होवून निवड झालेल्या संबधितांची कै.बाळासाहेब देशपांडे दवाखान्याकरिता मानधनावर नियुक्ती बाबत

कार्यवाही करण्यात आलेली होती,तद्नंतर वैद्यकीय अधिकारी यांचेकडील सादर झालेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने तांत्रिक खंड देवुन मा.स्थायी समितीच्या मंजुरी प्राप्त ठरावाच्या अनुषंगाने वेळोवेळी सह-सहा महिन्यांकरिता मानधनावर नियुक्ती बाबत कार्यचाही करण्यात येत असून संबंधित परिचारीका यांची यापुर्वी केलेल्या मानधनामध्ये वाढ बाबतची माहिती खालील प्रमाणे आहे.

| अ.नं. | नियुक्ती आदेश क्र.दिनांक | दरमहा मानधन रू. | केव्हापासून मानधन वाढ दि. | मा.स्था.स.ठ.क्र.दि. |
|---|---|---|---|---|
| १ | ५६२९/२६/१०/२०१५ | ६०००/- | २६/१०/२०१५ पासुन | वर्तमान पत्रामधील प्रसिध्द जाहिरातीच्या अनुषंगाने मा.आयुक्त यांचे मान्यतेने |
| २ | ५९/०४/०४/२०१८ | ८०००/- | ०६/०२/२०१८ पासुन | मा.स्था.स.ठ.क्र.६८ दि.०६/०२/२०१८चा पारित ठराव. |
| ३ | ७२२/११/०३/२०२० | १०,४००/- | १९/११/२०१९ पासुन | मा.स्था.स.ठ.क्र.१३९ दि.१७/०१/२०२०चा पारित ठराव. |

दरम्यानच्या काळात कै.बाळासाहेब देशपांडे दवाखान्यामधील तात्पुरत्या स्वरूपात परिचारीका यापदी दरमहा मानधनावर नियुक्तीकरिता १०% प्रमाणे दरमहा मानधन वाढ करणेबाबतचा प्रशासकीय प्रस्ताव निर्णयाकरिता मा.स्थायी समितीकडे इकडील जा.क्र.आस्था ३५१० दि.०८/११/२०२१ अन्वये पाठविण्यात आलेला होता.तथापि मा.स्थायी समिती ठराव क्र.१४२ दि.११/०१/२०२२ अन्वये संबधित तात्पुरत्या स्वरूपात परिचारीका यांचे दरमहा मानधनामध्ये थेट ४५%प्रमाणे वाढ करणेबाबत सुचित केलेले आहे.सद्यस्थितीमध्ये महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती बिकट आहे.त्यामुळे संदर्भिय अहवालाच्या अनुषंगाने व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमा मधिल ५३ च्या तरतुदीनुसार कै.बाळासाहेब देशपांडे दवाखान्याकरीता अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात परिचारीका यापदी मोहीनी अशोक गुंजाळ यांना तीन दिवसाच्या तांत्रिक खंड देवून दिनांक ०४/०६/२०२२ पासुन पुढील सहा महिन्याकरीता यापुर्वीच्या मुळ प्रस्तावामध्ये नमुद केल्यापासून दरमहा मानधनामध्ये १०%प्रमाणे वाढ करून अटी व शर्ती प्रमाणे दरमहा रू.११४४०/- या मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे बाबतच्या प्रस्तावास मा.स्थायी समितीची पुर्व मंजुरी मिळणेकामी निर्णयासाठी सादर करणे करीता मा.मुख्यलेखाधिकारी व मा.मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय घेवून सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे पाठविणेस मंजुरीस्तव आदेशार्थ सादर.

येणे प्रमाणे सहा.आयुक्त आस्थापना यांचा अहवाल असे.

यावर मा.मुख्यलेखाअधिकारी यांचा अभिप्राय की, प्रस्तावितप्रमाणे आदेशार्थ सादर.

यावर प्र.लेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,श्रीमती माहिनी अशोक गुंजाळ (बेरड) यांची कै.बा.दे.दवा येथे परिचारीका म्हणून तात्पुरत्या स्वरूपात गेली सात वर्षापासून नियुक्ती करून वेळोवेळी मुदतवाढ व मानधन वाढ देण्यात येत आहे.असे दिसुन येते.मा.शासन सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्र.एस.आर.व्ही.-२००५/प्र.क्र.४७ /०५/१२ दिनांक २५ ऑगस्ट २००५ मधील परिच्छेद ५ मध्ये "सर्व पदावरील नियुत्या विहीत मार्गाने /माध्यमामार्फत करण्याची दक्षता घ्यावी अत्यंत तातडीची गरज म्हणून तात्पुरत्या / अस्थायी नियुत्या कराव्या लागल्यातर त्या विहीत वेळेत संपुष्टात आणण्याची दक्षता घ्यावी " असे नमुद केले आहे.प्रस्तावित

परिचारिका यापदी पुढील मुदतवाढ देताना उपरोक्त शासन परिपत्रकान्वये अवलोकन करून उचित कार्यवाही करण्यात यावी.

यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, मुलेप यांचे अभिप्रायानुसार पुढील निर्णयाठी मा.स्थायी समितीसमोर पाठविण्यास मान्यतेस्तव सादर.

यावर मा.अति.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, "अ" मध्ये प्रस्तावित केल्यानुसार निर्णयास्तव मा.स्थायी समिती कडे पाठविण्यास मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**चर्चा :-**

विषय पत्रिकेतील विषय क्रमांक ५४ प्रमाणे

मा.श्री.मुदस्सर शेख :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.विषय पत्रिकेतील विषय क्रमांक ५५ ते ५७ हे नियुक्तीबाबतचे असल्याने मंजूर करण्यात यावेत.

मा.श्री.रविंद्र बारस्कर :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.विषय क्रमांक ५५ ते ५७ मानधनावरील नियुक्ती बाबतचे असल्याने या सर्व विषयांचे ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावेत.

मा.सभापती साहेब :- विषय क्रमांक ५५ ते ५७ चे ऑफिस रिपोर्ट मंजूर.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट नुसार कै.बाळासाहेब देशपांडे दवाखान्याकरीता अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात परिचारीका यापदी मोहीनी अशोक गुंजाळ यांना तीन दिवसाच्या तांत्रिक खंड देवून दिनांक ०४/०६/२०२२ पासुन पुढील सहा महिन्याकरीता दरमहा मानधनामध्ये १०%प्रमाणे वाढ करून अटी व शर्ती प्रमाणे दरमहा रू.११४४०/- या मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे बाबतच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.मुदस्सर शेख सही/-

अनुमोदक :- मा.श्री.रविंद्र बारस्कर सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक : ०५**

**विषय क्रमांक : ५६** **दिनांक :- १५/०७/२०२२**

---

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात लॅब टेक्निशियन यापदी मोरे पल्लवी दगडू यांची दरमहा मानधनावर तांत्रिक खंड देवून पुढील सहा महिन्याकरीता अटी व शर्ती प्रमाणे करारबध्द पुर्ननियुक्ती करणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका आस्थापना विभाग

**संदर्भ-** रक्तपेढी विभाग यांचेकडील जा.क्र.४१ दि. २७/०५/२०२२ अन्वयेचा प्रस्ताव

उपरोक्त विषयान्वये प्रस्ताव सादर करण्यात येतो की,रक्तपेढी विभाग यांनी त्यांचेकडील जा.क्र. ४१ दि.२७/११/२०२१ अन्वये प्रस्ताव सादर करून त्यामध्ये "रक्तपेढी विभागाकरीता करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात लॅब टेक्निशियन यापदी मोरे पल्लवी दगडू यांचा अटी व शर्तीनुसार मानधनावरील नियुक्तीचा कालावधी दि. ०८/०१/२०२२ ते ०७/०७/२०२२ अखेर सहा महिन्याकरिता असून सदरची मुदत ही दिनांक ०५/०१/२०२२ रोजी पासुन समाप्त होत असल्याने संबंधितांना तीन दिवसांचा तांत्रिक खंड देवून पुढील नियुक्तीबाबत " नमुद करून सुचित केलेले आहे.

सद्यस्थितीमध्ये मा.स्थायी समिती ठराव क्रमांक १५० दिनांक ११/०१/२०२२ अन्वये पारीत मंजुरी ठरावाच्या अनुषांगाने जा.क्र.आस्था.करारबध्द नेमणुक ३९५ दि.०४/०२/२०२२ अन्वये रक्तपेढी विभागासाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात लॅब टेक्निशीयन यापदी मोरे पल्लवी दगडू यांची रू.१६०००/-या दरमहा मानधनावर तांत्रिक खंड देवून दि.०८/०१/२०२२ पासुन सहा महिन्याकरीता अटी व शर्तीप्रमाणे करारबध्द पुर्ननियुक्ती करण्यात आलेली असून सदरच्या कालावधीतील केलेल्या करारबध्द मानधनावरील नियुक्तीची मुदत ही दि.०८/०७/२०२२ रोजी पासुन समाप्त होणार आहे.

तरी संदर्भिय अहवालाच्या अनुषंगाने व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमामधील कलम ५३ च्या तरतुदीनुसार रक्तपेढी विभागासाठी करारानुसार खालील तक्त्यात दर्शविलेल्या संबधितांची तात्पुरत्या स्वरूपात नमुद केलेल्या दरमहा मानधनावर त्यांना तीन दिवसांचा तांत्रिक खंड देवून दिनांक ११/०७/२०२२ पासून पुढील सहा महिन्याकरीता अटी व शर्ती प्रमाणे करारबध्द पुर्ननियुक्ती करणेबाबत मा.स्थायी समितीची पुर्व मंजुरी मिळणेकामी निर्णयाकरिता सादर करणेसाठी मा.मुख्य लेखाधिकारी व मा. मुख्य लेखापरिक्षक यांचा अभिप्राय घेवुन सदरचा प्रस्ताव मा. स्थायी समितीकडे पाठविणेस मंजुरीस्तव आदेशार्थ सादर.

| अ.क्र | नांव | तात्पुरत्या स्वरूपात पदनाम | दरमहा मानधन रक्कम | रूजु होण्याचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | मोरे पल्लवी दगडू | लॅब टेक्निशियन | १६,०००/- | रक्तपेढी विभाग |

येणे प्रमाणे प्र.मख्य लिपीक यांचा अहवाल असे.

यावर मा.आस्थापना विभाग प्रमुख यांचा अभिप्राय की,प्रस्तावित "अ" बाबत आदेशार्थ सादर.

यावर मा.मुख्य लेखाधिकारी यांचा अभिप्राय कि,प्रस्तावित बाबत आदेशार्थ सादर.

यावर अंतर्गत लेखापरिक्षक यांचा अभिप्राय की, महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्र.एस.आर.व्ही.-२००५/प्र.क्र.४७ /०५/१२ दिनांक २५ ऑगस्ट २००५ मधील परिच्छेद ५ मध्ये "सर्व पदावरील नियुत्या विहीत मार्गाने /माध्यमामार्फत करण्याची दक्षता घ्यावी अत्यंत तातडीची गरज म्हणून तात्पुरत्या / अस्थायी नियुत्या कराव्या लागल्यातर त्या विहीत वेळेत संपुष्टात आणण्याची दक्षता घ्यावी " असे नमुद केले आहे.प्रस्तावित लॅब टेक्नीशियन यापदी पुढील मुदतवाढ देताना उपरोक्त शासन परिपत्रकाचे अवलोकन करून उचित कार्यवाहीस्तव

यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, प्रस्तावीत "अ" "ब " व "क" मधिल अभिप्रायानुसार मा.स्थायी समितीसमोर ठेवण्यास निर्णयार्थ सादर.

यावर मा. अति. आयुक्त यांचा अभिप्राय कि,प्रस्तावित केल्यानुसार मा.स्थायी समिती कडे निर्णयास्तव पाठविण्यास मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**चर्चा :-**

विषय पत्रिकेतील विषय क्रमांक ५४ प्रमाणे

मा.श्री.मुदस्सर शेख :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.विषय पत्रिकेतील विषय क्रमांक ५५ ते ५७ हे नियुक्तीबाबतचे असल्याने मंजूर करण्यात यावेत.

मा.श्री.रविंद्र बारस्कर :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.विषय क्रमांक ५५ ते ५७ मानधनावरील नियुक्ती बाबतचे असल्याने या सर्व विषयांचे ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावेत.

मा.सभापती साहेब :- विषय क्रमांक ५५ ते ५७ चे ऑफिस रिपोर्ट मंजूर.

**<u>ठराव :-</u>** ऑफिस रिपोर्ट नुसार रक्तपेढी विभागासाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात लॅब टेक्निशीयन यापदी मोरे पल्लवी दगडू यांची दरमहा मानधनावर तीन दिवसांचा तांत्रिक खंड देवून पुढील सहा महिन्याकरीता अटी व शर्ती प्रमाणे करारबध्द पुर्ननियुक्ती करणे बाबतच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.मुदस्सर शेख सही/-

अनुमोदक :- मा.श्री.रविंद्र बारस्कर सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक : ०५**

**विषय क्रमांक : ५७** **दिनांक :- १५/०७/२०२२**

---

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका रक्तपेढी विभागासाठी तात्पुरत्या स्वरूपात श्री.शेख नईम युसुफ यांची लॅबटेक्नीशीयन या पदी अटी व शर्ती प्रमाणे मानधनावर कराबध्द नियुक्ती बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका रक्तपेढी विभाग

संदर्भ :- १.रक्तपेढी विभाग जा.क्र.२०३ दिनांक २९/१२/२०२१ अन्वये
२.रक्पपेढी आवक क्र.३४ दिनांक १५/०६/२०२२

उपरोक्त विषयान्वये विनंती पुर्वक अहवाल देण्यात येतो की,रक्तपेढी विभागामध्ये खालील तक्त्यामध्ये दर्शविल्या प्रमाणे कर्मचारी तात्पुरत्या स्वरूपात ,रक्तपेढी विभागामध्ये मानधनावर काम करत असून तक्त्यात नमुद केल्या प्रमाणे त्यांचा कालावधी दि.३०/०६/२०२२ अखेर आहे.सदर कर्मचा-यांचे काम समाधानकारक असुन रक्तपेढी विभागासाठी सदर कर्मचा-याची आवश्यकता आहे.

| अ.क्र. | नांव | पद | मुदत संपल्याचा कालावधी | मासिक मानधन | सहा महिन्या करिता एकुण खर्च |
|---|---|---|---|---|---|
| २ | शेख नईम युसुफ | लॅब टेक्निशीयन | ३०/०६/२०२२ | १७,०००/- | १,०२०००/- |
| | | | | एकुण | १,०२,०००/- |

तरी उपरोक्त तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे शेख नईम युसुफ नियमाप्रमाणे तीन दिवसांचा तांत्रिक खंड देवून दि.०४/०७/२०२२ पासुन पुढील सहा महिन्या करिता नियुक्ती देणेस व १०० रू.स्टॅम्प पेपरवर करारनामा करून घेणेस व त्या अनुशंगाने येणा-या रू.१,०२,०००/- च्या खर्चास व सदर चा खर्च लेखाशिर्षक,रक्तपेढी कंत्राटी कर्मचारी मानधन सन २०२२-२०२३ या मधुन करणेस मान्यतेस्तव सादर.तसेच सदरचा प्रस्ताव निर्णयास्तव मा.स्थायी समितीकडे पाठविणे कामी मान्यतेस्तव सादर.

येणे प्रमाणे रक्तसंक्रमाण अधिकारी यांचा अहवाल असे.

यावर मुख्यलेखाधिकारी यांचा अभिप्राय की,आदेशार्थ सादर.

यावर अंतर्गत लेखापरिक्षक यांचा अभिप्राय की, महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्र.एस.आर.व्ही.-२००५/प्र.क्र.४७ /०५/१२ दिनांक २५ ऑगस्ट २००५ मधील परिच्छेद ५ मध्ये "सर्व पदावरील नियुत्या विहीत मार्गाने /माध्यमामार्फत करण्याची दक्षता घ्यावी अत्यंत तातडीची गरज म्हणून तात्पुरत्या / अस्थायी नियुत्या कराव्या लागल्यातर त्या विहीत वेळेत संपुष्टात आणण्याची दक्षता घ्यावी " असे नमुद केले आहे.

प्रस्तावित रक्तपेढी विभागाकडे प्रयोगशाळा तंत्रज्ञ म्हणून मुदतवाढ देताना उपरोक्त शासन परिपत्रकाचे अवलोकन करून उचित कार्यवाही करण्यात यावी.

यावर मा.उपायुक्त(कर) यांची स्वाक्षरी.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**चर्चा :-**

विषय पत्रिकेतील विषय क्रमांक ५४ प्रमाणे

मा.श्री.मुदस्सर शेख :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.विषय पत्रिकेतील विषय क्रमांक ५५ ते ५७ हे नियुक्तीबाबतचे असल्याने मंजूर करण्यात यावेत.

मा.श्री.रविंद्र बारस्कर :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.विषय क्रमांक ५५ ते ५७ मानधनावरील नियुक्ती बाबतचे असल्याने या सर्व विषयांचे ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावेत.

मा.सभापती साहेब :- विषय क्रमांक ५५ ते ५७ चे ऑफिस रिपोर्ट मंजूर.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट नुसार रक्तपेढी विभागासाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात लॅब टेक्निशीयन यापदी शेख नईम युसुफ यांची दरमहा मानधनावर दिनांक दि.०४/०७/२०२२ पासून पुढील सहा महिन्याकरीता अटी व शर्ती प्रमाणे करारबध्द पुर्ननियुक्ती करणे बाबतच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.मुदस्सर शेख सही/-

अनुमोदक :- मा.श्री.रविंद्र बारस्कर सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## मा.स्थायी समिती सभा क्रमांक : ०५

**विषय क्रमांक : ५८** **दिनांक :- १५/०७/२०२२**

---

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर शहर पाणी पुरवठा योजनेसह वितरण व्यवस्थे करिता आवश्यक अभियंते आस्थापना विभागा मार्फत मानधनावर नियुक्ती करणे बाबत ऑफिस रिपोर्ट

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका पाणी पुरवठा विभाग

विनंती रिपोर्ट सादर की,अहमदनगर महानगरपालिकेच्या शहर पाणी पुरवठा योजनेसह वितरण व्यवस्थेकरीता कार्यरत असलेला तांत्रिक /अतांत्रिक कर्मचारी वर्ग मोठया संख्याने कमी झालेला आहेत.त्याचा परिणाम शहराच्या दैनंदिन पाणी वितरणावर विपरीत परिणाम होत आहे. व कर्मचा-या अभावी वितरण व्यवस्थेची व दुरूस्ती कामाची अत्यंत गंभीर समस्या निर्माण झालेली आहे.

मुळानगर पंपींग स्टेशन ते वसंतटेकडी दरम्यान कार्यरत पाणी पुरवठा योजना व संपुर्ण शहरातील पाणी वितरण व्यवस्थापनासह प्रगती पथावरील सदर योजनांच्या कामाचे विस्तृत स्वरूप लक्षात घेता कामानुषंगाने स्थापत्य व यांत्रिकी स्वरूपातील तांत्रिक कामकाजाचे स्वरूप मोठया प्रमाणात आहे.

त्यासाठी शहर पाणी पुरवठा योजनेसह सर्व प्रभागा करिता खालील प्रमाणे तांत्रिक / अतांत्रिक कर्मचारी कंत्राटी स्वरूपात उपलब्ध करणे कामी खाजगी एजन्सीची नेमणूक करणे कामी जाहिर ई निविदा प्रक्रिया राबवून मे.जेट सर्व्हिसेस ,पुणे यांचे कडून पाणी पुरवठा विभागाकडील दैनंदिन देखभाल व दुरूस्ती कामाच्या आवश्यते नुसार अभियंते कंत्राटी स्वरूपात उपलब्ध करून घेण्यात येत आहेत.आजमितीस जवळपास ७ अभियंते ठेकेदार संस्थे कडून उपलब्ध करून घेण्यात आले आहेत.

त्याचप्रमाणे ठेकेदार संस्था मे.जेट सर्व्हिसेस,पुणे यांचे कडून खालील प्रमाणे फिटर,इलेक्ट्रीशियन,वायरमन इत्यादी तांत्रिक कर्मचारी कंत्राटी स्वरूपात उपलब्ध करून घेतलेले आहेत.

१.इलेक्ट्रीशियन-१२ २.पंपचालक -०४ ३.फिटर-०४ ४. गाळणी चालक/परिचर-०२ ठेकेदार संस्था मे जेट सर्व्हिसेस ,पुणे यांचे कडून या विभागा कडील कामे करून घेण्यात येत आहेत.व अशा स्वरूपातील कर्मचा-यांना या विभागाकडील कामकाजाची माहिती होण्यास आणखी लागणार आहे.

परंतु वरील तांत्रिक कामे करणा-या कर्मचा-यांना या विभागाची कामकाजाची माहिती झाल्या नंतर सदरचे ठेकेदार एजन्सी यांनी त्यांचे सोई साठी संबंधित कर्मचा-यांना कामावरून कमी केल्यास अथवा काढून टाकल्यास व त्या जागी नवीन कर्मचारी उपलब्ध करून दिल्यास पुन्हा नविन कर्मचा-यास कामाची माहिती होणेस वेळ जाणार आहे.परिणामी अशा प्रकारा मुळे शहराचा पाणी पुरवठा वारंवार विस्कळीत होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

त्यासाठी आस्थापना विभागा कडून विहित पध्दतीने म्हणजेच वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्दीस देवून,मुलाखती घेवून या विभागस कंत्राटी करार पध्दतीने मानधन तत्वावर तांत्रिक कर्मचारी उपलब्ध करून दिल्यास अशा कर्मचा-यांना कामकाजाचे स्वरूप माहिती करून दिल्यानंतर एकंदीतच शहराचा पाणी पुरवठा सुरळीत ठेवणे या विभागास सोईचे होईल व तसे करणे अत्यंत गरजेचे व अनिवार्य आहे.त्यासाठी किमान खालील तांत्रिक दुद्याप्रमाणे कर्मचारी आस्थापना विभागा कडून मानधनावर उपलब्ध करणे गरजेचे आहे.

| अ.नं. | पदाचा तपशिल | पद संख्या | अ.नं. | पदाचा तपशिल | पद संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १ | यंत्र अभियंता | ०१ | ५ | पंपचालक | १५ |
| २ | स्थापत्य अभियंता | ०७ | ६ | फिटर | ०४ |
| ३ | व्हॉलमन/मदतनीस | ०७ | ७ | विद्युत अभियंता | ०१ |
| ४ | इलेक्ट्रीशियन | १५ | | | |

यास्तव वरील सर्व परिस्थिती विचारात घेता शहर पाणी पुरवठा योजने सह वितरण व्यवेस्थे करिता या विभागास आवश्यक असलेले वरील नमुद तपशिला प्रमाणे तांत्रिक कर्मचारी व अभियंत्यांची् आस्थापना विभागा कडून विहीत पध्दतीने म्हणजेच वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्दीस देवून,मुलाखती घेवून या विभागास कंत्राटी करार पध्दतीने मानधन तत्वावर कर्मचारी उपलब्ध करून देणे बाबत आस्थापना विभागास उचित आदेश होणेस विनंती आहे.
येणे प्रमाणे जल अभियंता यांचा अहवाल असे.

यावर मा.उपयुक्त(कर) यांचा अभिप्राय की,Labour Tender मध्ये,अभियंता आहेत.त्यात मुलाखती घेवून नेमणुका अथवा यासाठी सक्षम चर्चा करा. चर्चा केली, लेबर पुरवठा टेंडर असताना जल अभियंता मानधन वरती अभियंते घेण्यास आग्रही आहेत.टेंडर रद्द करून कार्यवाही करणेस मान्यतेस सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की,पुढील विहीत कार्यपध्दतीचा अवलोकन करून कार्यवाही करावी.

यावर मा.जल अभियंता यांचा अभिप्राय की,मा.फेरसादर,याबाबत दि.२६/०५/२०२२ रोजी मा.सभापती,स्थायी समिति यांचे दालनात मा.अति.आयुक्त,मा.उपायुक्त(सा) मा.मुलेअ यांचे समवेत बैठक घेण्यात आली.सदर बैठकीत सदर विषयास मा.स्थायी समितीची मंजुरी घेणेबाबत ठरले.

सद्नुसार सदर बाबत मा.स्थायी समितीची मंजुरी घेणे कामी सदर विषय मा.स्थायी समितीकडे सादर करणेस मान्यतेस्तव सादर.
यावर मा.उपायुक्त (कर) मा.आयुक्त साहेब यांचे समवेत समक्ष चर्चा करा.
यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, "अ" प्रमाणे प्रस्ताव सादर करा.

सबब प्रकरण मा.स्थायी समितीकडे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब : - विषयाबाबत माहिती देण्यात यावी.

मा.जल अभियंता श्री.निकम :- पाणी पुरवठा विभागाकडे इंजी.वॉलमन,इलेक्टीशीयन यांची पदे मोठया प्रमाणावर रिक्त आहेत.कर्मचा-यांअभावि शहराचा पाणीपुरवठा वेळोवेळी विस्कळीत झालेला आहे.खाजगी ठेकेदाराकडून नेमणूक केलेल्या कर्मचा-यांच्या कामामध्ये सातत्य नसते.संपुर्ण कामकाजाबाबत त्यांना माहिती करून देण्याकरीता बराच कालावधी जातो.माहिती झाल्यानंतर ते कर्मचारी कामावर रहातीलच याची खात्री नसते.पुन्हा नविन कर्मचारी नियुक्त केल्यानंतर त्या कर्मचा-यास सर्व कामकाजाबाबत पुन्हा नव्याने माहिती दयावी लागते.यापुर्वी खाजगी ठकेदारामार्फत नेमणूक
केलेल्या कर्मचा-या बाबत खुप वाईट अनुभव आलेले आहेत.मानधनावर कर्मचारी नियुक्त केल्यास चांगल्या प्रकारे कर्मचारी तयार करता येतील.

मा.श्री.मुदस्सर शेख :- महानगरपालिका सेवेतुन सेवानिवृत्त झालेल्या कामगारांना प्रधान्य दया.त्यांना मानधनावर घ्या.

जल अभियंता श्री.निकम :- सेवानिवृत्त झालेल्या महानगरपालिका कर्मचा-यांना मानधनावर घेणे बाबत प्रस्ताव दिलेला आहे.सध्या दोन ते तीन क्लार्क मानधनावर घेतलेले आहेत.

मा.सभापती साहेब :- माझ्या स्वत:च्या प्रभागामध्ये पाण्याबाबत खुप मोठी अडचण असून वेळोवेळी संपर्क करूनही पाणी पुरवठयामध्ये सुधारणा होत नाही.

मा.पाणी पुरवठा विभाग प्रमुख श्री.सातपुते:- बोल्हेगांव भागामध्ये फेज-२ चे काम मोठया प्रमाणावर झालेले आहे.काही ठिकाणी पाईप जोडणी करणे बाकी आहे.पॉइंट जोडणीचे काम विभागामार्फत चालू केलेले आहे.
मा.सभापती साहेब :- फेज-२ चे कामाकरीता नेमणूक केलेले ठेकेदार तापी वगैरे कामे करणार नाहीत.प्रशासनामार्फतच आपल्याला काहीतरी करावे लागणार आहे.
पाणी पुरवठा विभाग प्रमुख श्री.सातपुते:- फेज-२ चे काम घेतलेले ठेकेदार, मुख्य मालक कोणीही येत नाहीत.
मा.सभापती साहेब :- संबधीत ठकेदाराची कामासंदर्भात देयके निघाले नसल्यामुळे ते येत नाहीत.
मा.मुख्यलेखाधिकारी :-सदर किरकोळ कामाबाबत वार्षिक दर करार करणे आवश्यक आहे.
मा.पाणी पुरवठा विभाग प्रमुख श्री.सातपुते:- या पुर्वी किरकोळ कामा करीता वार्षीक टेंडर काढले होते.कोणीही टेंडर भरण्यास तयार होत नाही.
प्रकल्प विभाग प्रमुख श्री.गाडळकर :- वार्षीक मशिनरी करीता टेंडर काढले होते.कोणीही टेंडर भरलेले नाही.शेवटच्या कॉलला एक टेंडर आलेले आहे.टेंडर व्यतिरीक्त असलेले साहित्य मार्केट मधून घ्यावयाचे आहे.तसेच प्रकल्प विभागाकरीता एक स्वतंत्र्य अभियंत्याची नियुक्ती करण्यात यावी.
मा.सभापती साहेब :- श्री.गाडळकर यांच्या मागणी प्रमाणे अभियंते मिळतील का?
मा.उपायुक्त (कर) श्री.डांगे :- प्रकल्प विभाग ,पाणी पुरवठा विभाग,इले. विभाग यांना अभियंते देणार आहोत.
मा.मुख्यलेखापरिक्षक श्री.पवार :- वरंवार मानधनावर अभियंते नियुक्त केल्यानंतर ते कायम नियुक्तीची मागणी करतील.
मुख्यलेखाधिकारी श्री.मोरे :- मानधनावरील कर्मचारी नियुक्त केल्यानंतर त्यांचे मानधन व ई.पी.एस.चे काय करणार.वार्षीक टेंडर काढणे योग्य होईल.
मा.उपायुक्त (कर) श्री.डांगे :- वॉलमन ,बिगारी,आवुटसोर्सीग ने घ्या,
मा.श्री.विनीत पाउुलबुधे :- ठेकेदारामार्फत कर्मचारी नियुक्त केल्यानंतर त्या कर्मचा-यास पुरेसा पगार मिळत नाही.ठेकेदार तीन ते चार महिने पगार देत नाही.कर्मचारी मानधनावर घेण्यात यावेत.
जल अभियंता श्री.निकम :- कर्मचारी घेणे बाबतचा विषय आस्थापना विभागामार्फत घेण्यात यावा.
शहर अभियंता श्री.इथापे :- आउटसोअरसिंग ने कर्मचारी घेणे बाबत टेंडर काढण्यात आले होते.सदरचे टेंडर क्वॉलीफाय झालेले नाही.वारंवार कर्मचारी बदलणे योग्य नाही.
मा.श्री.विनीत पाउुलबुधे :- आवश्यक असणारा कर्मचारी वर्ग मानधावर घेण्यात यावा.
उपायुक्त श्री.डांगे :- ज्या विभागांना कर्मचा-यांची आवश्यकता असेल त्यांनी एकत्र प्रस्ताव दयावा.
मा.अती.आयुक्त श्री.पठारे :- मा.स्थायी समिती ठराव झाल्यांनंतर आस्थापना विभाग पुढील कार्यवाही करील.
मा.श्री.सचिन शिंदे :- महानगरपालिकेने घेतलेले जे.सी.बी.दहा फुटापर्यतही जात नाहीत.शहरामध्ये दिवसाआड पाणी देण्यात येते.आमच्या भागामध्ये आठ दिवसामधून पाणी येत नाही.
मा.उपायुक्त (सा) श्री.डांगे :- कल्याण रोडला बांधण्यात आलेल्या टाकीमधून तुमची काही हरकत नसेल तर तेथुन तुम्हाला पाणी पुरवठा करू.
मा.श्री.सचिन शिंदे :- पेपरमध्ये आलेल्या बातमीनुसार आम्हाला दिवसाआड पाणी पुरवठा करण्यात यावा.
जल अभियंता श्री.निकम :- सदयस्थितीमध्ये उपलब्ध होत असलेल्या पाण्यानुसार कल्याण रोड भागाकरीता दिवसाआड पाणी देता येणार नाही.पुर्वी दहा बारा दिवसांनी पाणी देण्यात येत होते.ते कमी करून आपण पाच ते सहा दिवसांमध्ये पाणी पुरवठा केला जातो.
मा.श्री.सचिन जाधव :- कल्याण रोड या भागाकरीता ज्या प्रमाणात पाणी पुरवठा केला जातो त्या प्रमाणात पाणीपट्टी माफ करण्यात यावी.
उपायुक्त श्री डांगे :- चार दिवसांमधून एकदा कल्याणरोडला पाणी मिळेल या बाबत पाणी पुरवठा विभागाने कार्यवाही करावी.

जल अभियंता श्री.निकम :- मुख्यजलवाहिनीचे काम अंतीम टप्यात आहे.साधारणतः ५० मीटर काम रखडले होते.तेथील शेतकरी आता काम करून देण्यास तयार आहेत.

मा.सभापती साहेब :- फेज-२ चे कामकज जलद गतीने पुर्ण होणे करीता त्याचा पाठपुरावा करणे गरजेचे असल्याने मा.स्थायी समितीतर्फे मा.श्री.सचिन शिंदे,सदस्य स्थायी समिती व मा.श्री.रविंद्र बारस्कर ,सदस्य स्थायी समिती यांना समितीवर घेण्यात यावे.तसेच कल्याण रोड भागाकरीता टॅकरच्या खेपा वाढविण्यात याव्यात.

मा.श्री.मुदस्सर शेख :- कचरा संकलन करणा-या टेंडरची मुदत संपलेली आहे.नविन टेंडर केव्हा काढणार.तसेच ठेकेदाराने कचरा गाडया कमी केलेल्या आहेत.

मा.उपायुक्त(कर) श्री.डांगे :- नविन टेंडर काढले आहे.६४ घंटागाडया मार्फत कचरा गोळा करून रॅम्पवर आणल्या जातत.वजना नुसार ठेकेदाराला पेमेंट अदा केले जाते.१०-१५ दिवसांमध्ये पुढील टेंडरचे काम होईल.

मा.सभापती साहेब :- आम्हाला आमच्या प्रभागाकरीता लोकसहभागातुन काही काम करता येईल का?नविन होणा-या ले आउटमधील बांधकाम करतांना ठेकेदार आवश्यकते नुसार साईजमध्ये ड्रेनेज लाईन टाकत नाहीत.

मा.उपायुक्त(कर)श्री.डांगे :- नविन ले आउट विकसीत करते वेळी ,विकासकाने मुख्य रस्त्यापर्यत ड्रेनेज लाईन,पाण्याची लाईन टाकणे आवश्यक आहे.

मा.सभापती साहेब :- ले आउटचा विकास करतांना ठेकेदारामार्फत टाकण्यात येणारी ड्रेनेज लाईन व पाण्याची लाईन आणि महानगरपालिकेमार्फत जाणारी ड्रेनेज व पाण्याची लाईन यांची लेवल येत नाही.नविन ले आउटमध्ये ड्रेनेज लाईन पाण्याच्या लाईनचे पैसे महानगरपालिकेमध्ये भरणा करून घेवून महानगरपालिकेमार्फत नविन ले आउटमध्ये पाण्याची लाईन व ड्रेनेज लाईन टाकणे योग्य होईल.

मा.उपायुक्त(कर)श्री.डांगे :- सदरचा विषय हा धोरणात्मक स्वरूपाचा असल्याने मा.महासभेमध्ये निर्णय घेणे योग्य होईल.

मा.सभापती साहेब :- नविन ले आउटमधील ड्रेनेज लाईन व पिण्याच्या पाण्याची लाईन संदर्भात स्थायी समिती मध्ये झालेल्या चर्चे नुसार नगररचना विभागाने तसा प्रस्ताव तयार करून मा.महासभेकडे पाठवावा.

मा.सौ.रूपाली वारे :- पावसाळा सुरू होवून एक महिन्याचा कालावधी होवून देखील आमच्या प्रभागामध्ये फवारणी झालेली नाही.डासांचे प्रमाण वाढल्याने आजाराचे प्रमाण वाढले आहे.

वैद्यकीय आरोग्य अधिकारी श्री.बोरगे :- मलेरीया फवारणीकरीता ५० लोकांना नेमणूकीकरीता प्रस्ताव दिलेला आहे.सदयस्थितीमध्ये १५ फवारणी कर्मचारी कार्यरत असून त्यांच्याकडून काम करून घेण्यात येते.

मा.श्री.मुदस्सर शेख :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्री.रविंद्र बारस्कर:- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- शहर पाणी पुरवठा योजने सह वितरण व्यवस्थे करिता या विभागास आवश्यक असलेले ऑफिस रिपोर्ट मध्ये नमुद केल्यानुसार तांत्रिक कर्मचारी व अभियंत्यांची आस्थापना विभागा कडून विहीत पध्दतीने म्हणजेच वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्दीस देवून,मुलाखती घेवून पाणी पुरवठा विभागास कंत्राटी करार पध्दतीने मानधन तत्वावर कर्मचारी उपलब्ध करून देणे बाबत आस्थापना विभागा मार्फत कार्यवाही करणे बाबतच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.तसेच मंजूर रेखांकनातील अंतर्गत सुधारणा करताना रेखांकन धारकाकडून अंतर्गत पिण्याच्या पाण्याच्या लाईन व ड्रेनेज लाईनचे कामे महानगरपालिकेमार्फत करण्यात यावीत.मुख्य लाईनला जोडणी करते वेळी लेव्हल येत नाही.तसेच पिण्याच्या पाईपलाईन ची सुध्दा व्यवस्थीत लेवल येत नाही.या कामाची अंदाजपत्रकीय रक्कम महानगरपालिका फंडात जमा करून घेवून सदर कामे ही महानगरपालिकेमार्फत करणे बाबतचा निर्णय हा धोरणात्मक असल्याने सभेमध्ये झालेल्या चर्चे नुसार नगररचना विभागाने या बाबतचा प्रस्ताव तयार करून तात्काळ मा.महासभेकडे पाठविणे बाबतची शिफारस करण्यात येत आहे.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट नुसार शहर पाणी पुरवठा योजने सह वितरण व्यवस्थे करिता या विभागास आवश्यक असलेले ऑफिस रिपोर्ट मध्ये नमुद केल्यानुसार तांत्रिक कर्मचारी व अभियंत्यांची आस्थापना विभागा कडून विहीत पध्दतीने म्हणजेच वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्दीस देवून,मुलाखती घेवून पाणी पुरवठा विभागास कंत्राटी करार पध्दतीने मानधन तत्वावर कर्मचारी उपलब्ध करून देणे बाबत आस्थापना विभागा मार्फत कार्यवाही करणे बाबतच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर. तसेच मंजूर रेखांकनातील अंतर्गत सुधारणा करताना रेखांकन धारकाकडून अंतर्गत पिण्याच्या पाण्याच्या लाईन व ड्रेनेज लाईनचे कामे सध्या रेखांकन धारकाकडून करून घेण्यात येते,परंतु असे निदर्शनास येते कि,रेखांकन धारकाकडून पिण्याच्या पाण्याची लाईन व ड्रेनेज लाईनची कामे अत्यंत निकृष्ठ दर्जाची होत असल्याने,आवश्यकते पेक्षा कमी व्यासाची पाईप लाईन करण्यात येते व सदर पिण्याची पाईप लाईन व ड्रेनेज ची लाईन महानगरपालिकेच्या मुख्य लाईनला जोडणी करते वेळी लेव्हल येत नसल्याने या ड्रेनेज लाईनचा नागरीकांना उपयोग होत नाही.त्यामुळे ड्रेनेज लाईन फुटून रस्त्यावर मैलामिस्त्रीत पाणी रस्त्यावर येवून रोगराई पसरते व नागरीकांच्या आरोग्यास धोका निर्माण होते.तसेच पिण्याच्या पाईपलाईन ची सुध्दा व्यवस्थीत लेवल येत नाही.त्यामुळे पाणी पुरवठा योग्य दाबाने होत नाही.या करीता मंजूर रेखांकनातील अंतर्गत सुधारणा करताना पाण्याची लाईन व ड्रेनेज इत्यादी कामे रेखांकन धारकाकडून करून घेणे ऐवजी या कामाची अंदाजपत्रकीय रक्कम महानगरपालिका फंडात जमा करून घेवून सदर कामे ही महानगरपालिकेमार्फत करणे बाबतचा निर्णय हा धोरणात्मक असल्याने सभेमध्ये झालेल्या चर्चे नुसार नगररचना विभागाने या बाबतचा प्रस्ताव तयार करून तात्काळ मा.महासभेकडे पाठविणे बाबतची शिफारस करण्यात येत आहे.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.मुदस्सर शेख सही/-

अनुमोदक :- मा.श्री.रविंद्र बारस्कर सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक : ०५**

**विषय क्रमांक : ५९** **दिनांक :- १५/०७/२०२२**

---

**प्रस्तावाचा विषय :-** साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाउ साठे नागरी वस्ती सुधार योजना सन २०२१-२२ई - निविदा क्रमांक ७९६५३३ अंर्तगत प्रभाग क्रमांक १४ मधील केदारवस्ती पाण्याची टाकी ,ओपन स्पेसला संरक्षण भिंत बांधणे व ओपन स्पेस विकसित करणे या निविदेच्या मंजूरी बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका सार्व.बांधकाम विभाग

उपरोक्त विषयाबाबत खालीलप्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे.

१.प्राशासकिय मान्यता :- मा.जिल्हाधिकारी,अ.नगर यांची दि.२८/०३/२०२२

२.ई- निविदा क्रमांक ७९६५३३/सन २०२२-२३ दि.२९/०४/२०२२

३.निविदा विक्री कालावधी दि.०९/०५/२०२२ ते दि.२३/०५/२०२२

४. निविदा स्विकारणेची दिनांक ०९/०५/२०२२ ते दि.२३/०५/२०२२

५.निविदा उघडणेचा दिनांक २५/०५/२०२२

६.कामाची मुदत ०६ महिने

७.प्राप्त झालेल्या निविदेचा तपशील दि.२२/०६/२०२२ रोजीच्या मा.छाननी समितीचे शिफारशीनुसार

| ई - निविदा क्रमांक | कामाचे नांव | निविदा रक्कम | निविदा दाखल करणारे ठेकेदार | निविदेमध्ये भरलेला दर (निविदा दरापेक्षा) | सर्वात कमी दराचे निविदाधारक व त्यांचा दर |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| ७९६५३३ | प्रभाग क्रमांक १४ मधील केदारवस्ती पाण्याची टाकी ओपन स्पेसला संरक्षक भिंत बांधणे व ओपन स्पेस विकसित करणे | ३४,५२,३६४/- | यश कंस्ट्रक्शन अ.नगर | निविदा दराने | यश कंस्ट्रक्शन अ.नगर निविदा दराने |
| | | | श्री.गणेश सप्ला&कॉन्ट्रॅ.अ.नगर | निविदा दरापेक्षा ३.००%जादा दराने | |

वरील रकाना क्र.६ मध्ये नमुद निविदाधारक यश कंन्स्ट्रक्शन,अहमदनगर यांनी सदरची निविदा निविदा दराने आलेली आहे.सदरची निविदा सर्वात कमी दराची आहे.

तरी यश कंस्ट्रक्शन,अहमदनगर यांची आलेली कमी दराची ई - निविदा मा.स्थायी समितीपुढे मान्यतेस्तव ठेवणेस आदेशार्थ ऑफिस रिपोर्ट सादर.

येणे प्रमाणे उप - अभियंता यांचा अहवाल असे.

यावर मा.शहर अभियंता यांची स्वाक्षरी

यावर मा.मुख्यलेखाधिकारी यांची स्वाक्षरी

यावर मा.मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील प्रकरण -२० नियम ७३(क) प्रमाणे कार्यवाही करून प्रस्तावित निविदाकार यांची निविदा दराने निविदा कार्यवाहीस्तव

यावर मा.सहाय्यक आयुक्त यांचा अभिप्राय की,"अ" प्रमाणे मा.स्थायी समितीसमोर ठेवणेस आदेशार्थ सादर.

यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की,प्रस्तावित "अ" "ब" "क" व "ड" मधील अभिप्रायानुसार अंदाजपत्रकीय दराची निविदा निर्णयास्तव मा.स्थायी समितीसमोर ठेवण्यास मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती समोर सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाउ साठे नागरी वस्ती सुधार योजना सन २०२१-२२ई - निविदा क्रमांक ७९६५३३ अंर्तगत प्रभाग क्रमांक १४ मधील केदारवस्ती पाण्याची टाकी ,ओपन स्पेसला संरक्षण भिंत बांधणे व ओपन स्पेस विकसित करणे या निविदेच्या मंजूरी बाबत ऑफिस रिपोर्ट.

मा.श्री.विनीत पाउलबुधे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार सभेमध्ये ऑफिस रिपोर्टचे वाचन करण्यात आले.

मा.श्री.विनीत पाउलबुधे :- ऑफिस रिपोर्ट मंजुर करण्यात यावा.

मा.श्री.सचिन शिंदे :- ऑफिस रिपोर्ट मंजुर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाउ साठे नागरी वस्ती सुधार योजना सन २०२१-२२ई - निविदा क्रमांक ७९६५३३ अंर्तगत प्रभाग क्रमांक १४ मधील केदारवस्ती पाण्याची टाकी ,ओपन स्पेसला संरक्षण भिंत बांधणे व ओपन स्पेस विकसित करणे निविदाधारक यश कंन्स्ट्रक्शन,अहमदनगर यांच्या निविदा दराच्या निविदेस मान्यता देण्यात येत आहे.

ठराव :- ऑफिस रिपोर्ट नुसार साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाउ साठे नागरी वस्ती सुधार योजना सन २०२१-२२ई - निविदा क्रमांक ७९६५३३ अंर्तगत प्रभाग क्रमांक १४ मधील केदारवस्ती पाण्याची टाकी ,ओपन स्पेसला संरक्षण भिंत बांधणे व ओपन स्पेस विकसित करणे या कामाचे निविदाधारक यश कंन्स्ट्रक्शन,अहमदनगर यांच्या निविदा दराच्या निविदेस मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.विनीत पाउलबुधे सही/-

अनुमोदक :- मा.श्री.सचिन शिंदे सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक : ०५**

---

**विषय क्रमांक : ६०** **दिनांक :- १५/०७/२०२२**

---

**प्रस्तावाचा विषय :-** साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाउ साठे नागरी वस्ती सुधार योजना सन २०२१-२२ई - निविदा क्रमांक ७९३४१८ अंर्तगत प्रभाग क्रमांक १५ मधील महात्मा फुले वसाहत ते मेन लाईन पर्यत ६००एमएम एन पी-२आर सीसी पाईप गटर करणे ,प्र.क्र.१५मधील काटवन खंडोबा रोड ते महात्मा फुले वसाहत ते रात्र निवारा केंद्रपर्यत रस्त्याचे कॉक्रीटीकरण करणे या निविदेच्या मंजूरी बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका सार्व.बांधकाम विभाग

उपरोक्त विषयाबाबत खालीलप्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे.

१.प्राशासकिय मान्यता :- मा.जिल्हाधिकारी,अ.नगर यांची दि.२८/०३/२०२२
२.ई- निविदा क्रमांक ७९३४१८/सन २०२२-२३ दि.२८/०४/२०२२
३.निविदा विक्री कालावधी दि.२८/०४/२०२२ ते दि.२३/०५/२०२२
४. निविदा स्विकारणेची दिनांक २८/०४/२०२२ ते दि.२३/०५/२०२२
५.निविदा उघडणेचा दिनांक २५/०५/२०२२
६.कामाची मुदत ०६ महिने
७.प्राप्त झालेल्या निविदेचा तपशील दि.२२/०६/२०२२ रोजीच्या मा.छाननी समितीचे शिफारशीनुसार

| ई - निविदा क्रमांक | कामाचे नांव | निविदा रक्कम | निविदा दाखल करणारे ठेकेदार | निविदेमध्ये भरलेला दर (निविदा दरापेक्षा) | सर्वात कमी दराचे निविदाधारक व त्यांचा दर |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| ७९३४१८ | अ)प्रभाग क्रमांक १५ मधील महात्मा फुले वसाहत ते मेन लाईन पर्यत ६००एमएम एन पी २आरसीसी पाईप गटर करणे प्र.क्र.१५मधील काटवन खंडोबा रोड ते महात्मा फुले वसाहत ते रात्र निवारा केंद्रपर्यत रस्त्याचे कॉक्रीटीकरण करणे | ६०,०५,५७४/- | यश कंस्ट्रक्शन अ.नगर | निविदा दरापेक्षा ३.००%जादा दराने | श्री.गणेश सप्ला&कॉन्ट्रॅ.अ.नगर |
| | | | श्री.गणेश सप्ला&कॉन्ट्रॅ.अ.नगर | निविदा दराने | निविदा दराने |

वरील रकाना क्र.६ मध्ये नमुद निविदाधारक श्री.गणेश सप्ला&कॉन्ट्रॅ.अहमदनगर यांनी सदरची निविदा निविदा दराने आलेली आहे.सदरची निविदा सर्वात कमी दराची आहे.

तरी श्री.गणेश सप्ला&कॉन्ट्रॅ.अ.नगर यांची आलेली कमी दराची ई - निविदा मा.स्थायी समितीपुढे मान्यतेस्तव ठेवणेस आदेशार्थ ऑफिस रिपोर्ट सादर.

येणे प्रमाणे उप - अभियंता यांचा अहवाल असे.
यावर मा.शहर अभियंता यांची स्वाक्षरी
यावर मा.मुख्यलेखाधिकारी यांची स्वाक्षरी

यावर मा.मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील प्रकरण - २० नियम ७३(क) प्रमाणे कार्यवाही करून प्रस्तावित केले नुसार निविदाकार यांची निविदा दराने निविदा कार्यवाहीस्तव सादर (Bid दिसुन येत नाही + किती टेंडर आले)

यावर मा.सहा. आयुक्त यांचा अभिप्राय की,"अ""ब" प्रमाणे मा.स्थायी समितीसमोर ठेवणेस आदेशार्थ सादर.

यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की,प्रस्तावित "अ" "ब" "क" व "ड" मधील अभिप्रायानुसार अंदाजपत्रकीय दराची निविदा निर्णयास्तव मा.स्थायी समितीसमोर ठेवण्यास मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती समोर सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाउ साठे नागरी वस्ती सुधार योजना सन २०२१-२२ई - निविदा क्रमांक ७९३४१८ अंर्तगत प्रभाग क्रमांक १५ मधील महात्मा फुले वसाहत ते मेन लाईन पर्यत ६००एमएम एन पी-२आर सीसी पाईप गटर करणे ,प्र.क्र.१५मधील काटवन खंडोबा रोड ते महात्मा फुले वसाहत ते रात्र निवारा केंद्रपर्यत रस्त्याचे कॉक्रीटीकरण करणे या निविदेच्या मंजूरी बाबत ऑफिस रिपोर्ट.

मा.श्री.विनीत पाउलबुधे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार सभेमध्ये ऑफिस रिपोर्टचे वाचन करण्यात आले.

मा.श्री.विनीत पाउलबुधे :- ऑफिस रिपोर्ट मंजुर करण्यात यावा.

मा.श्री.सचिन शिंदे :- ऑफिस रिपोर्ट मंजुर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाउ साठे नागरी वस्ती सुधार योजना सन २०२१-२२ई - निविदा क्रमांक ७९३४१८ अंर्तगत प्रभाग क्रमांक १५ मधील महात्मा फुले वसाहत ते मेन लाईन पर्यत ६००एमएम एन पी-२आर सीसी पाईप गटर करणे ,प्र.क्र.१५मधील काटवन खंडोबा रोड ते महात्मा फुले वसाहत ते रात्र निवारा केंद्रपर्यत रस्त्याचे कॉक्रीटीकरण करणे या निविदेचे निविदाधारक गणेश सप्लायर्स &कॉन्टॅक्टर,अहमदनगर यांच्या निविदा दराच्या निविदेस मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट नुसार साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाउ साठे नागरी वस्ती सुधार योजना सन २०२१-२२ई - निविदा क्रमांक ७९३४१८ अंर्तगत प्रभाग क्रमांक १५ मधील महात्मा फुले वसाहत ते मेन लाईन पर्यत ६००एमएम एन पी-२आर सीसी पाईप गटर करणे ,प्र.क्र.१५मधील काटवन खंडोबा रोड ते महात्मा फुले वसाहत ते रात्र निवारा केंद्रपर्यत रस्त्याचे कॉक्रीटीकरण करणे या निविदेचे निविदाधारक गणेश सप्लायर्स &कॉन्टॅक्टर,अहमदनगर यांच्या निविदा दराच्या निविदेस मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.विनीत पाउलबुधे सही/-

अनुमोदक :- मा.श्री.सचिन शिंदे सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## मा.स्थायी समिती सभा क्रमांक : ०५

**विषय क्रमांक : ६१** **दिनांक :- १५/०७/२०२२**

---

**प्रस्तावाचा विषय :-** साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाउ साठे नागरी वस्ती सुधार योजना सन २०२१-२२ई - निविदा क्रमांक ७९५८३६ अंतर्गत प्रभाग क्रमांक १७ मधील अ) इंदिरानगर पासून मकासरे ते खरात घरापर्यत रस्त्याचे डांबरीकरण करणे ब) प्रभाग क्र.१७ मधील इंदिरानगर ते क्षत्रे घर आढाव घर ते आरोळे घरापर्यत रस्त्याचे डांबरीकरण करणे या निविदेच्या मंजूरी बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका सार्व.बांधकाम विभाग

उपरोक्त विषयाबाबत खालीलप्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे.

१.प्राशासकिय मान्यता :- मा.जिल्हाधिकारी,अ.नगर यांची दि.२८/०३/२०२२

२.ई- निविदा क्रमांक ७९५८३६/सन २०२२-२३ दि.०६/०५/२०२२

३.निविदा विक्री कालावधी दि.०६/०५/२०२२ ते दि.२०/०५/२०२२

४. निविदा स्विकारणेची दिनांक ०६/०५/२०२२ ते दि.२०/०५/२०२२

५.निविदा उघडणेचा दिनांक २३/०५/२०२२

६.कामाची मुदत ०६ महिने

७.प्राप्त झालेल्या निविदेचा तपशील दि.२२/०६/२०२२ रोजीच्या मा.छाननी समितीचे शिफारशीनुसार

| ई - निविदा क्रमांक | कामाचे नांव | निविदा रक्कम | निविदा दाखल करणारे ठेकेदार | निविदेमध्ये भरलेला दर (निविदा दरापेक्षा) | सर्वात कमी दराचे निविदाधारक व त्यांचा दर |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| ७९५८३६ | प्रभाग क्रमांक १७ मधील अ) इंदिरानगर पासून मकासरे ते खरात घरापर्यत रस्त्याचे डांबरीकरण करणे<br>ब) प्रभाग क्र.१७ मधील इंदिरानगर ते क्षत्रे घर आढाव घर ते आरोळे घरापर्यत रस्त्याचे डांबरीकरण करणे<br>अ)प्र.क्र.१७ इंदिरानगर पासून मकासरे ते खरात घरापर्यत रस्त्याचे डांबरीकरण करणे | ४५,३७,८०६/- | चेतन मा.जाधव अ.नगर<br>यश कंस्ट्रक्शन अ.नगर | निविदा दराने<br>निविदा दरापेक्षा ३.००%जादा दराने | चेतन मा.जाधव अ.नगर<br>निविदा दराने |

वरील रकाना क्र.६ मध्ये नमुद निविदाधारक चेतन मा.जाधव अ.नगर यांनी सदरची निविदा निविदा दराने आलेली आहे.सदरची निविदा सर्वात कमी दराची आहे.

तरी चेतन मा.जाधव,अहमदनगर यांची आलेली कमी दराची ई - निविदा मा.स्थायी समितीपुढे मान्यतेस्तव ठेवणेस आदेशार्थ ऑफिस रिपोर्ट सादर.

येणे प्रमाणे उप - अभियंता यांचा अहवाल असे.

यावर मा.शहर अभियंता यांची स्वाक्षरी

यावर मा.मुख्यलेखाधिकारी यांची स्वाक्षरी

यावर मा.मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील प्रकरण - २० नियम ७३(क) नुसार कार्यवाही करून प्रस्तावित केले नुसार निविदाकार यांची निविदा दराने निविदा कार्यवाहीस्तव सादर (Bid दिसुन येत नाही )

यावर मा.सहा. आयुक्त यांचा अभिप्राय की,"अ", "ब" प्रमाणे मा.स्थायी समितीसमोर ठेवणेस आदेशार्थ सादर.

यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की,प्रस्तावित "अ" "ब" "क" व "ड" मधील अभिप्रायानुसार अंदाजपत्रकीय दराची निविदा निर्णयास्तव मा.स्थायी समितीसमोर ठेवण्यास मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती समोर सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाउ साठे नागरी वस्ती सुधार योजना सन २०२१-२२ई - निविदा क्रमांक ७९५८३६ अंतर्गत प्रभाग क्रमांक १७ मधील अ) इंदिरानगर पासून मकासरे ते खरात घरापर्यंत रस्त्याचे डांबरीकरण करणे ब) प्रभाग क्र.१७ मधील इंदिरानगर ते क्षत्रे घर, आढाव घर ते आरोळे घरापर्यंत रस्त्याचे डांबरीकरण करणे या निविदेच्या मंजूरी बाबत ऑफिस रिपोर्ट.

मा.श्री.विनीत पाउलबुधे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार सभेमध्ये ऑफिस रिपोर्टचे वाचन करण्यात आले.

उप अभियंता,बांधकाम विभाग श्री.निंबाळकर :- सदर प्रस्तावामधील कामाच्या नांवाबाबत "अ" "ब" "क" असे तीन कामे होती. "अ" व "ब " मधील कामे प्रस्तावामध्ये आलेली आहे.परंतु नजरचुकीने "क" मधील काम टाकण्याची राहीले आहे."क" मध्ये पुन्हा "अ "मधील काम टायपींग चुकी मुळे आले आहे.तरी सदरची चुक दुरूस्त करून प्रस्तावा मध्ये "क" मधिल काम समाविष्ट करण्यात यावे ही विनंती.

मा.सभापती साहेब :- मुळ फाईल पाहून प्रस्तावातील कामा मध्ये "क" मधिल काम ठरावामध्ये समाविष्ठ करून घ्यावे व मुळ रिपोर्ट पाहून दुरूस्ती करण्यात यावी.

मा.श्री.विनीत पाउलबुधे :- ऑफिस रिपोर्ट मंजुर करण्यात यावा.

मा.श्री.सचिन शिंदे :- ऑफिस रिपोर्ट मंजुर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाउ साठे नागरी वस्ती सुधार योजना सन २०२१-२२ई - निविदा क्रमांक ७९५८३६ अंतर्गत प्र.क्र. १७ मधील अ) इंदिरानगर पासून मकासरे ते खरात घरापर्यंत रस्त्याचे डांबरीकरण करणे ब) प्रभाग क्र.१७ मधील इंदिरानगर ते क्षत्रे घर आढाव घर ते आरोळे घरापर्यंत रस्त्याचे डांबरीकरण करणे क)प्र.क्र.१७ मधील विद्यानगर ते दौंड रोड मकासरे ते साबळे आणि कांबळे ते शिंदे आणि देठे ते देठे आणि शिंदे ते गायकवाड ते दौंड रोड ते मिश्रा आणि गहिले ते देठे ते कांबळे आणि देठे ते गायकवाड आणि कांबळे ते गवारे आणि उजागरे ते गहिले आणि कांबळे ते

शेख ते मेन नाल्यापर्यत ३०० एमएम व्यासाची आरसीसी पाईप गटर करणे या प्रस्तामधील दुरूस्ती सह निविदेचे निविदाधारक चेतन मा.जाधव अ.नगर यांच्या निविदा दराच्या निविदेस मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट नुसार साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाउ साठे नागरी वस्ती सुधार योजना सन २०२१-२२ई - निविदा क्रमांक ७९५८३६ अंर्तगत अ) प्र.क्र. १७ मधील इंदिरानगर पासून मकासरे ते खरात घरापर्यत रस्त्याचे डांबरीकरण करणे ब) प्रभाग क्र.१७ मधील इंदिरानगर ते क्षत्रे घर आढाव घर ते आरोळे घरापर्यत रस्त्याचे डांबरीकरण करणे क)प्र.क्र.१७ मधील विद्यानगर ते दौंड रोड मकासरे ते साबळे आणि कांबळे ते शिंदे आणि देठे ते देठे आणि शिंदे ते गायकवाड ते दौंड रोड ते मिश्रा आणि गहिले ते देठे ते कांबळे आणि देठे ते गायकवाड आणि कांबळे ते गवारे आणि उजागरे ते गहिले आणि कांबळे ते शेख ते मेन नाल्यापर्यत ३०० एमएम व्यासाची आरसीसी पाईप गटर करणे या प्रस्तामधील दुरूस्ती सह निविदेचे निविदाधारक चेतन मा.जाधव अ.नगर यांच्या निविदा दराच्या निविदेस मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.विनीत पाउुलबुधे सही/-

अनुमोदक :- मा.श्री.सचिन शिंदे सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिति
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक : ०५**

**विषय क्रमांक : ६२** **दिनांक :- १५/०७/२०२२**

---

**प्रस्तावाचा विषय :-** प्रादेशिक पर्यटन विकास निधी - सन २०२१-२२ ई - निविदा क्रमांक ७९३४७८ अंतर्गत अहमदनगर महानगरपालिकेच्या हद्दीतील कै.गंगाराम शास्त्री गुणे चौक ते स्वास्तिक चौक व कै.हिराबाई भापकर पुतळा ते वाडीयापार्क कोपरा जाणा-या रस्त्याचे गटर व्यवस्थेसह कॉक्रीटीकरण करणे या निविदेच्या मंजूरी बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका सार्व.बांधकाम विभाग

उपरोक्त विषयाबाबत खालीलप्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे.

१.प्राशासकिय मान्यता :- मा.जिल्हाधिकारी,अ.नगर यांची दि.२९/०३/२०२२

२.ई- निविदा क्रमांक ७९३४७८/सन २०२२-२३ दि.२८/०४/२०२२

३.निविदा विक्री कालावधी दि.२८/०४/२०२२ ते दि.२३/०५/२०२२

४. निविदा स्विकारणेची दिनांक २८/०४/२०२२ ते दि.२३/०५/२०२२

५.निविदा उघडणेचा दिनांक २५/०५/२०२२

६.कामाची मुदत ०९ महिने

७.प्राप्त झालेल्या निविदेचा तपशील दि.३०/०६/२०२२ रोजीच्या मा.छाननी समितीचे शिफारशीनुसार

| ई - निविदा क्रमांक | कामाचे नांव | निविदा रक्कम | निविदा दाखल करणारे ठेकेदार | निविदेमध्ये भरलेला दर (निविदा दरापेक्षा) | सर्वात कमी दराचे निविदाधारक व त्यांचा दर |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| ७९३४७८ | प्रादेशिक पर्यटन विकास निधी - सन २०२१-२२ ई - निविदा क्रमांक ७९३४७८ अंतर्गत अहमदनगर महानगरपालिकेच्य हद्दीतील कै.गंगाराम शास्त्री गुणे चौक ते स्वास्तिक चौक व कै.हिराबाई भापकर पुतळा ते वाडीयापार्क कोपरा जाणा-या रस्त्याचे गटर व्यवस्थेसह कॉक्रीटीकरण करणे | ४,४०,२६,४२१/- | श्री.अभिजीत अशोक काळे अ.नगर | निविदा दरापेक्षा ९.००%जादा दराने | निविदा दराने |
| | | | मे.बेस्ट कंस्ट्रक्शन कंअ.नगर | निविदा दरापेक्षा २५.००% जादा दराने | |

वरील रकाना क्र.४ मध्ये नमुद निविदाधारक श्री.अभिजीत अशोक काळे,अ.नगर यांनी सदरची निविदा निविदा दरापेक्षा ९.९९% जादा दराने आलेली आहे.सदरची निविदा सर्वात कमी दराची आहे.तथापि सर्वात कमीचे निविदाधारकाने सदर काम निविदा दराने करणेबाबत सदर्भ क्र.२ अन्वये इकडेस कळविले आहे.

तरी कमी दराचे निविदाधारक श्री.अभिजीत अशोक काळे,अ.नगर हे सदर काम निविदा दराने करणेस तयार असल्याने त्यानुसार सदरचा प्रस्ताव निर्णयास्तव मा.स्थायी समितीपुढे ठेवणेस आदेशार्थ ऑफिस रिपोर्ट सविनय सादर.

येणे प्रमाणे उप - अभियंता यांचा अहवाल असे.

यावर मा.शहर अभियंता यांची स्वाक्षरी

यावर मा.मुख्यलेखाधिकारी यांची स्वाक्षरी

यावर मा.मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील नियम ७३(क) नुसार कार्यवाही करून प्रस्तावित केले नुसार निविदाकार यांची निविदा दराची निविदा पुढील कार्यवाहीस्तव

यावर मा.सहाय्यक आयुक्त यांचा अभिप्राय की,"अ" "ब" प्रमाणे मा.स्थायी समितीसमोर ठेवणेस आदेशार्थ सादर.

यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की,प्रस्तावित "अ" "ब" "क" व "ड" मधील अभिप्रायानुसार श्री.अभिजीत काळे यांचा निविदा दराची निविदा निर्णयास्तव मा.स्थायी समितीपुढे ठेवण्यास मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती समोर सादर.

--**--

**<u>चर्चा :-</u>**

मा.सभापती साहेब :- प्रादेशिक पर्यटन विकास निधी - सन २०२१-२२ ई - निविदा क्रमांक ७९३४७८ अंतर्गत अहमदनगर महानगरपालिकेच्य हद्दीतील कै.गंगाराम शास्त्री गुणे चौक ते स्वास्तिक चौक व कै.हिराबाई भापकर पुतळा ते वाडीयापार्क कोपरा जाणा-या रस्त्याचे गटर व्यवस्थेसह कॉक्रीटीकरण करणे या निविदेच्या मंजूरी बाबत ऑफिस रिपोर्ट.

मा.श्री.विनीत पाउलबुधे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार सभेमध्ये ऑफिस रिपोर्टचे वाचन करण्यात आले.

मा.श्री.विनीत पाउलबुधे :- ऑफिस रिपोर्ट मंजुर करण्यात यावा.

मा.श्री.सचिन शिंदे :- ऑफिस रिपोर्ट मंजुर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- प्रादेशिक पर्यटन विकास निधी - सन २०२१-२२ ई - निविदा क्रमांक ७९३४७८ अंतर्गत अहमदनगर महानगरपालिकेच्या हद्दीतील कै.गंगाराम शास्त्री गुणे चौक ते स्वास्तिक चौक व कै.हिराबाई भापकर पुतळा ते वाडीयापार्क कोपरा जाणा-या रस्त्याचे गटर व्यवस्थेसह कॉक्रीटीकरण करणे या कामाकरीता श्री.अभिजीत अशोक काळे,अ.नगर यांनी सदरची निविदा निविदा दरापेक्षा ९.९९% जादा दराने आलेली आहे.

सदरची निविदा सर्वात कमी दराची आहे.तथापि निविदाधारक श्री.अभिजीत अशोक काळे,अ.नगर हे सदर काम निविदा दराने करणेस तयार असल्याने त्यांच्या निविदा दराच्या निविदेस मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव :-** प्रादेशिक पर्यटन विकास निधी - सन २०२१-२२ ई - निविदा क्रमांक ७९३४७८ अंतर्गत अहमदनगर महानगरपालिकेच्या हद्दीतील कै.गंगाराम शास्त्री गुणे चौक ते स्वास्तिक चौक व कै.हिराबाई भापकर पुतळा ते वाडीयापार्क कोपरा जाणा-या रस्त्याचे गटर व्यवस्थेसह कॉक्रीटीकरण करणे या कामाकरीता श्री.अभिजीत अशोक काळे,अ.नगर यांनी सदरची निविदा निविदा दरापेक्षा ९.९९% जादा दराने आलेली आहे.सदरची निविदा सर्वात कमी दराची आहे.तथापि निविदाधारक हे सदर काम निविदा दराने करणेस तयार असल्याने श्री.अभिजीत अशोक काळे,अ.नगर यांच्या निविदा दराच्या निविदेस मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.विनीत पाउुलबुधे सही/-

अनुमोदक :- मा.श्री.सचिन शिंदे सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका